गडचिरोली या आदिवासी जिल्हयामध्ये वर्ग३ व व.४ मधील जिल्हानिहाय संवर्गात सरळसेवा प्रवेशाने भरती करताना १००बिंदू रोस्टर ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
निर्णय क्रमांक:- बीसीसी-११८७/२७७६/(सीआर-२९६/८७)/१६ब,
मंत्रालय, मुंबई:-४०००३२,
दिनांक:- १५ ऑक्टोबर १९८७.

पहा:- १)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-१०७२/जे, दिनांक ६ जून १९७२
२)शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:-बीसीसी-१०८४/(सीआर-२०४/८३) दिनांक७ जानेवारी, १९८४.

निर्णय:- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:- बीसीसी-१०७२/जे, दिनांक ६जून, १९७२अन्वये शासनाने खालील सहा जिल्हयांमध्ये वर्ग३व वर्ग४ मधील जिल्हानिहाय संवर्गातील पदे सरळसेवा प्रवेशाने भरतांना अनुसूचित जमातीकरिता पुढील प्रमाणे खास जिल्हानिहाय आरक्षण विहीत केलेले आहे.

| | |
|---|---|
| ठाणे | २२% |
| नाशिक | २२% |
| धुळे | २२% |
| कुलाबा (रायगड) | ९% |
| यवतमाळ | १४% |
| चंद्रपूर | १५% |

२. महसूल व वन विभागाच्या क्रमांक:- आरईएन-५१८१/४४१२/(९४०)/एम-१०, दिनांक २३ऑगष्ट१९८२ च्या अधिसूचनेव्दारे पूर्वीच्या चंद्रपूर जिल्हयाचे विभाजन करून चंद्रपूर व गडचिरोली असे दोन जिल्हे निर्माण केले. मूळच्या चंद्रपूर जिल्हयामध्ये आदिवासींसाठी शासकीय सेवेत भरतीसाठी १५%: आरक्षण विहित केलेले होते. नवनिर्मित गडचीरोली जिल्हयामध्ये आदिवासीसाठी किती प्रमाणात आरक्षण ठेवावे हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, नवनिर्मित गडचिरोली जिल्हयात चंद्रपूर जिल्हयाप्रमाणे आदिवासीकरिता शासकीय सेवेत भरतीसाठी १५% आरक्षण लागू करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(फ. ना. बर्वे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,

मुख्यमंत्री यांचे सचिव

सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,

* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,

* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,

* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त कार्यालय, मुंबई,

* आदिवासी विकास विभाग, व

इतर सर्व मंत्रालयीन विभाग

सर्व विभागीय आयुक्त,

* जिल्हाधिकारी, चंद्रपूर व जिल्हाधिकारी गडचिरोली

इतर सर्व जिल्हाधिकारी.

[जिल्हाधिकारी, चंद्रपूर व गडचिरोली यांना विनंती आहे की, सदर आदेश त्यांच्या जिल्ह्यातील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावेत.]

* पत्राने